**तळोधी मोकासा उपसा सिंचन योजना**
**ता. चामोर्शी, जि. गडचिरोली**
**योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय**
**मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: २४४/विपाविम/कातां ६(२)/(धा.क्र.५२/२०१९)/ तळोधीमोकासा उसिंयो /प्रथम सुप्रमा / २०२१, दि. ३० / १२ /२०२१**

**संदर्भ :-** १. विपाविमं/ कातां-६/७२/ तळोधी मोकासा उसियो /प्रमा/ (१३/२००७)/२००९, दि.२७.२.२००९.
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/कक्ष-१(मु)/ भिमलकसा लपा/(धा.क्र.५६/२०१९)/८९८/ २०१९ , दि. २६/०९/२०१९.
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.१५/०७/२०२१ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२१/(२२२ /२०२१)/लपा, दिनांक ०२/०८/२०२१.
५. विपाविम नियामक मंडळाचे दि. ११/११/२०२१ चे ८१ व्या बैठकीतील ठराव क्र. ८१/११

**प्रस्तावना :**

तळोधी मोकासा उपसा सिंचन योजना, या महामंडळांतर्गत नक्षलप्रवण,आदिवासी क्षेत्रातील असून गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील दर्शनीमाल गावाजवळ वैनगंगा नदीवर बांधकामाधीन आहे. सदर प्रकल्पाद्वारे गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील १६ गावातील ४३३० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

तळोधी मोकासा उपसा सिंचन योजनेस, महामंडळाचे निर्णय (संदर्भ क्र. १) नुसार सन २००८-२००९ चे दरसुचीवर आधारीत रू. ५७.१७ कोटी (रू. सत्तावन कोटी सतरा लक्ष फक्त) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान, योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जादा दराची निविदा स्विकृतीमुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल, अपु-या तरतुदी, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या १७१.९७ टक्क्याने वाढत असल्यामुळे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

तळोधी मोकासा उपसा सिंचन योजनाचा प्रथम सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. ११.०८.२०१९ रोजीच्या १३७ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

तळोधी मोकासा उपसा सिंचन योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि. १५.०७.२०२१ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. ११.११.२०२१ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ८१ व्या बैठकीतील ठराव क्र. ८१/११ नुसार तळोधी मोकासा उपसा सिंचन योजनेच्या रू. १५५.४६ कोटी अंदाजित किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास

मा.सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यता किंमतीच्या तुलनेत प्रथम सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. ९८.३० कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू कोटी | एकूण वाढीच्या तुलनेत टक्केवारी | मंजूर सुप्रमा किंमतीच्या तुलनेत टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | दरसूचीतील बदलामुळे | २०.६१ | २०.९७ % | ३६.०६ % |
| २ | जास्त दराची निविदा स्विकृतीमुळे | -३.३७ | -३.४३ % | -५.९० % |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ५.५६ | ५.६६ % | ९.७३% |
| ४ | नविन तरतुदी केल्यामुळे झालेली वाढ | ३.०३ | ३.०८ % | ५.३० % |
| ५ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ४३.२७ | ४४.०२ % | ७५.७० % |
| ६ | अपुऱ्या तरतुदीमुळे झालेली वाढ | १७.९० | १८.२२ % | ३१.३३ % |
| ७ | इतर कारणामुळे झालेली वाढ | ३.१८ | ३.२३ % | ५.५६ % |
| ८ | अनुषंगिक खर्च | ८.११ | ८.२५ % | १४.१९ % |
| | **एकूण** | ९८.३० | **१००.००** % | १७१.९७ % |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये गडचिरोली जिल्ह्यातील तळोधी मोकासा उपसा सिंचन योजना, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. १५५.४६ कोटी (रू. एकशे पंचावन्न कोटी, शेहचाळीस लक्ष फक्त) या किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. १४१.९६ कोटी (रू. एकशे एकेचाळीस कोटी छहान्नव लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. १३.५० कोटी (रू. तेरा कोटी पन्नास लक्ष फक्त) अनुषंगीक खर्च समाविष्टआहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१७-१८ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

**१.** ठळक बाबी —

- **योजनेचा सुधारीत पाणीवापर** - **३२.७५ दलघमी**
- **योजनेचे सिंचन क्षेत्र** - **४३३० हेक्टर**
- **योजनेचा आर्थिक परतावा दर** - **१५.३४ %**
- **योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** - **२.५१ (मापदंड :- १.५० पेक्षा जास्त)**

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०१", मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)- सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००)(०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता ( ०२ /२०२१) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.